**L. A. BILL No. LXXVI OF 2025.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA SLUM AREAS

(IMPROVEMENT, CLEARANCE AND REDEVELOPMENT) ACT, 1971.

**सन २०२५ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ७६.**

**महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ यात**

**आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

१९७१ चा महा. २८

**ज्याअर्थी**, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :-

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे.

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ३ड ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ३ड मध्ये, खंड (ब) मधील, उप-खंड (तीन) मध्ये, कलम १३ मधील, पोट-कलम (१) मध्ये, "एकशेवीस दिवसांपेक्षा" या मजकुराऐवजी, "साठ दिवसांपेक्षा" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९७१ चा महा. २८.

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम १५अ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम १५अ मध्ये, पोट-कलम (१) मधील,–

(एक) "झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे काम पूर्ण झाल्यापासून तीस दिवसांच्या आत," या मजकुराऐवजी, "झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या पुनर्वसन घटकाचे काम पूर्ण झाल्यापासून तीस दिवसांच्या आत," हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(दोन) विद्यमान परंतुकापूर्वी, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु, ज्यावेळी राज्य विधानमंडळाद्वारे अधिनियमित केलेल्या कोणत्याही कायद्यान्वये घटित केलेल्या राज्य शासनाच्या कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाद्वारे किंवा नागरी स्थानिक संस्थेद्वारे किंवा नियोजन प्राधिकरणाद्वारे किंवा सरकारी उपक्रम एजन्सीद्वारे, किंवा यथास्थिति, इतर कोणत्याही शासकीय कंपनीद्वारे, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणासोबत संयुक्त उपक्रमामध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविली जात असेल त्या बाबतीत, अशा झोपडपट्टी पुनर्वसन योजनेला इरादा पत्र (एल ओ आय) दिल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, राज्य शासनास किंवा राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेने, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास, झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून अशा प्रकारे घोषित केलेली अशी जमीन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे निहित होईल, असे **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, घोषित करता येईल.";

(तीन) विद्यमान परंतुकातील "परंतु," या मजकुराऐवजी, "परंतु आणखी असे की," हा मजकूर दाखल करण्यात येईल."

सन १९७१ चा अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ३३अ ऐवजी बदली कलम दाखल करणे.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३३अ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

योजनेत किंवा प्रकल्पात सामील होण्यास इच्छुक नसलेल्या झोपडपट्टी रहिवाशांना गाळ्यांचे वाटप करण्याची कार्यपद्धती.

"**३३अ.** झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा किंवा झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पाचा भाग असलेली इमारत किंवा संरचना ज्याच्या कब्जात किंवा भोगवट्यात असेल आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून किंवा यथास्थिति, सक्षम प्राधिकरणाकडून कायमस्वरूपी पर्यायी निवासव्यवस्थेकरिता जे पात्र असतील आणि जे अशा योजनेमध्ये किंवा प्रकल्पामध्ये सामील होण्यास इच्छुक नसतील अशा झोपडपट्टी रहिवाशांच्या बाबतीत, मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा सक्षम प्राधिकरण,—

(अ) योजनेच्या किंवा प्रकल्पाच्या पुनर्वसन घटकाकरिता बांधावयाच्या इमारतींमध्ये अशा सर्व झोपडपट्टी रहिवाशांकरिता कायमस्वरूपी पर्यायी निवासव्यवस्थेची तरतूद करण्यात आली असल्याची सुनिश्चिती करील;

(ब) योजनेमध्ये किंवा प्रकल्पामध्ये सामील झालेल्यांना विकासकाने कळविल्यानुसार त्याच धर्तीवर, चिट्ठ्या टाकून नियतवाटप करून गाळे देण्यात येणार असल्याचे अशा झोपडपट्टी रहिवाशांना लेखी कळवील;

(क) झोपडपट्टी रहिवाशांना किमान १२० चौरस फुटाच्या संक्रमण गाळ्यांचे नियतवाटप करण्यात येईल, किंवा संक्रमण निवासस्थानाऐवजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून किंवा यथास्थिति, सक्षम प्राधिकरणाकडून निश्चित करण्यात येईल इतकी भाड्याची रक्कम देण्यात येईल असे, कळवील;

(ड) झोपडपट्टी रहिवाशांना त्यांच्या कब्जात असलेल्या संरचनेमधून निष्कासित करण्याचा आणि निर्मूलन आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा कालावधीत अशी संरचना किंवा त्याचा कोणताही भाग पाडण्याचा निदेश देईल, आणि अशा निष्कासनाच्या प्रयोजनासाठी आवश्यक असेल अशा बळाचा त्यास वापर करता येईल किंवा वापर करण्याची व्यवस्था करील;

(इ) जे झोपडपट्टी रहिवासी अशा योजनेमध्ये किंवा प्रकल्पामध्ये सामील होण्यास इच्छूक नाहीत आणि ज्यांच्या विरुद्ध खंड (ड) अन्वये कार्यवाही प्रस्तावित केली आहे अशा झोपडपट्टी रहिवाशांना, लेखी स्वरूपात असे कळवील की, अशी कार्यवाही केल्यानंतर ते संक्रमण गाळ्याकरिता किंवा, पुनर्बांधकाम केलेल्या गाळ्याकरिता चिठ्ठ्या टाकून पात्र असणार नाहीत परंतु, ते, योजनेतील किंवा प्रकल्पातील इतरांनी आपापल्या गाळ्यांची निवड केल्यानंतर जे उपलब्ध असतील त्या गाळयांकरिताच केवळ हक्कदार असतील;

(फ) जर झोपडपट्टी रहिवासी, योजनेच्या किंवा प्रकल्पाच्या पहिल्या इमारतीस बांधकाम परवानगी मिळेपर्यंत सामील झाले नाहीत तर, ते बांधलेला कोणताही गाळा मिळण्याचा हक्क गमावतील आणि त्यांचे गाळे, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून किंवा सक्षम प्राधिकरणाकडून ताब्यात घेण्यात येतील आणि ज्यांची तिथल्या तिथेच निवासव्यवस्था होऊ शकत नाही अशा इतर झोपडपट्टी रहिवाशांची निवासव्यवस्था करण्याच्या प्रयोजनासाठी त्याचा वापर करण्यात येईल आणि जर व जेव्हा इतरत्र उपलब्ध होईल केवळ तेव्हाच ते सुमारे ३ मीटर x ३.५ मीटरचे क्षेत्र (पीच) मिळण्यास हक्कदार असतील आणि त्यामधील बांधकाम, अशा झोपडपट्टी रहिवाशांना स्वतः करावे लागेल, असे, झोपडपट्टी रहिवाशांना लेखी कळवील.".

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३३अ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :-

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ मध्ये नवीन कलम ३३ब समाविष्ट करणे.

"**३३ब.** (१) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे किंवा झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पाचे पात्र झोपडपट्टी रहिवासी, प्राधिकरणाकडून निर्धारित करण्यात येईल अशा रीतीने व अशा शुल्कासह, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे किंवा यथास्थिति, सक्षम प्राधिकरणाकडे अशा योजनेच्या किंवा प्रकल्पाच्या विकासकाकडून संक्रमण निवासस्थानाच्या बदल्यात देय असलेले भाडे वसूल करण्यासाठी, अर्ज करू शकतील.

विकासकांकडून देय असलेल्या भाड्याची वसुली करणे.

(२) जेव्हा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची किंवा यथास्थिति, सक्षम प्राधिकरणाची, कोणत्याही झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या किंवा झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पाच्या विकासकाने, मान्य केल्यानुसार, पात्र झोपडपट्टी रहिवाशांना संक्रमण निवासस्थानाच्या बदल्यात भाडे देण्यात कसूर केली आहे, अशी खात्री पटली असेल त्या बाबतीत, मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा सक्षम प्राधिकरण, स्वतःहून किंवा पात्र झोपडपट्टी रहिवाशांकडून अर्ज मिळाल्यावर, देय असलेल्या कोणत्याही रकमेच्या बाबतीत योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा निर्धारित कालावधीत अशा रकमेच्या वसुलीसाठी आदेश काढू शकेल.

(३) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने, किंवा यथास्थिति, सक्षम प्राधिकरणाने काढलेल्या वसुलीच्या अशा प्रत्येक आदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेली रक्कम, विकासकाने आदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत प्रदान न केल्यास, ती रक्कम, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कायद्यानुसार, जमीन महसूलाची थकबाकी असल्याप्रमाणे, वसूल करण्यात येईल :

परंतु, जर ज्या व्यक्तीविरुद्ध वसुलीचा आदेश काढण्यात आला असेल ती व्यक्ती ही, वसुलीच्या आदेशान्वये देय असलेल्या रकमेची पूर्तता करण्यासाठी पुरेशी मालमत्ता नसलेली कंपनी किंवा मर्यादित दायित्व भागीदारी संस्था असेल तर, अशी रक्कम, अशा कंपनीच्या, किंवा यथास्थिति, भागीदारी संस्थेच्या संचालकांच्या किंवा भागीदारांच्या वैयक्तिक मालमत्तेतून वसूल करण्यात येईल.".

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८याच्या कलम ३५ ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३५ मधील,-

२०२३ चा महा. ३३.

(१) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा, शिखर व इतर तक्रार निवारण समित्यांच्या नियमांचे व अधिसूचनेचे पुनर्अधिनियमितीकरण व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०२३ याद्वारे दाखल केलेल्या मुख्य अधिनियमाच्या कलम ३५ चे पोट-कलम (१अ) हे, ८ मार्च, २०१७ पासून उक्त सुधारणा अधिनियमाद्वारे दाखल केल्याचे किंवा दाखल करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल;

२०२३ चा महा. ३३.

(२) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा, शिखर व इतर तक्रार निवारण समित्यांच्या नियमांचे व अधिसूचनेचे पुनर्अधिनियमितीकरण व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०२३ याद्वारे दाखल केलेल्या मुख्य अधिनियमाच्या कलम ३५ चे पोट-कलम (५) हे, ८ मार्च, २०१७ पासून उक्त सुधारणा अधिनियमाद्वारे दाखल केल्याचे किंवा दाखल करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल.

विधीग्राह्यीकरण व व्यावृत्ती.

१९७१ चा महा. २८.

२०२३ चा महा. ३३.

**७.** महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ किंवा कोणत्याही न्यायालयाचा, न्यायाधिकरणाचा किंवा प्राधिकरणाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेश यांमध्ये एतद्विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, ८ मार्च, २०१७ पासून प्रारंभ होणाऱ्या आणि महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (सुधारणा, शिखर व इतर तक्रार निवारण समित्यांच्या नियमांचे व अधिसूचनेचे पुनर्अधिनियमितीकरण व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०२३ (यात यापुढे, या कलमामध्ये ज्याचा निर्देश, “सुधारणा अधिनियम” असा केला आहे) याच्या प्रारंभाच्या दिनांकास समाप्त होणाऱ्या कालावधीमध्ये, उक्त अधिनियम, नियम व अधिसूचना या अन्वये शिखर तक्रार निवारण समितीने व तक्रार निवारण समित्यांनी दिलेल्या आदेशांसह, केलेल्या किंवा हाती घेतलेल्या सर्व कारवाया, कार्यवाह्या किंवा गोष्टी ह्या, सुधारणा अधिनियमाद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे, उक्त अधिनियमाच्या तरतुदी, जणू काही सर्व वेळी सातत्याने अंमलात आल्या होत्या असे समजून, कायद्यानुसार यथोचितरीत्या व वैधरीत्या हाती घेण्यात किंवा करण्यात आल्या असल्याचे मानण्यात येतील आणि त्यानुसार, उक्त समित्यांनी दिलेल्या आदेशांनुसार, कोणत्याही झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या संबंधात कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा प्राधिकाऱ्याने हाती घेतलेल्या सर्व कारवाया अथवा केलेल्या कार्यवाह्या किंवा गोष्टी ह्या, सर्व प्रयोजनांसाठी, सुधारणा अधिनियमाद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे, अधिनियमाच्या तरतुदींनुसार करण्यात आलेल्या असल्याचे किंवा हाती घेण्यात आलेल्या असल्याचे मानण्यात येतील आणि त्या नेहमीकरिता करण्यात आलेल्या असल्याचे किंवा हाती घेण्यात आलेल्या असल्याचे मानण्यात येतील.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (१९७१ चा महा. २८) हा राज्यातील झोपडपट्ट्यांची सुधारणा व निर्मूलन करणे यासाठी व त्यांच्या पुनर्विकासासाठी आणि भोगवटदारांना निष्कासित होण्यापासून आणि अटकावणी अधिपत्रापासून संरक्षण देण्यासाठी अधिनियमित केला आहे. उक्त अधिनियमात, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या तसेच झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पांच्या अंमलबजावणीची देखील तरतूद केली आहे. या अधिनियमाच्या तरतुदींमध्ये स्पष्टता आणण्यासाठी, उक्त अधिनियमामध्ये सुयोग्य सुधारणा करणे इष्ट आहे, असे वाटते.

**२.** प्रस्तावित सुधारणांची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत :—

(एक) कलम १३ च्या पोट-कलम (१) अन्वये जमिनीच्या पुनर्विकासासाठी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या संरक्षित व इतर भोगवटादारांच्या पुनर्स्थाननिश्चितीसाठी व पुनर्वसनासाठी आवश्यक असलेला कालावधी एकशेवीस दिवसांवरून साठ दिवसांपर्यंत कमी करणे ;

(दोन) जेव्हा कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाद्वारे, नागरी स्थानिक संस्थेद्वारे, नियोजन प्राधिकरणाद्वारे, सरकारी उपक्रम एजन्सीद्वारे किंवा कोणत्याही शासकीय कंपनीद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणासोबत संयुक्त उपक्रमामध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविली जात असेल त्या बाबतीत, झोपडपट्टी पुनर्वसन जमीन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे निहित करण्यासाठी आणि त्यानंतर संबंधित शासकीय किंवा निम-शासकीय एजन्सींना उक्त जमीन भाडेपट्ट्याने देण्यासाठी कलम १५अ मध्ये तरतूद करणे ;

(तीन) पात्र झोपडपट्टी रहिवाशांना गाळ्यांचे वाटप करण्याची पद्धत विस्तृत करण्यासाठी कलम ३३अ मध्ये सुयोग्य सुधारणा करणे ;

(चार) संक्रमण निवासस्थानाऐवजी विकासकाकडून देय असलेल्या भाड्याच्या रकमेची, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसुली करण्यासाठी कलम ३३ब अन्वये तरतूद करणे ;

**३.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक ७ जुलै, २०२५.

**एकनाथ शिंदे,**
उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण).

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत :—

**खंड ३ (१).—** या अधिनियमाच्या कलम १५ च्या पोट-कलम (१) मध्ये परंतुक दाखल करण्याचा हेतू असलेल्या या खंडान्वये, जेव्हा कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाद्वारे किंवा नागरी स्थानिक संस्थेद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणासोबत संयुक्त उपक्रमामध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात येत असेल त्या बाबतीत, झोपडपट्टी पुनर्वसन जमीन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे निहित होईल असे **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे घोषित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे किंवा राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे घेण्यात येत आहे.

२. वैधनिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा वर नमूद केलेला प्रस्ताव, सामान्य स्वरूपाचा आहे.

## सन २०२५ चे वि.स. विधेयक क्रमांक -७६ महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास)
## (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ याचे परिशिष्ट.

**[ महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ यातील उतारे ]**

**(सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८)**

**१.** ते **३.** ** ** **

**३-अ.** ते **३-क.** ** ** **

झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्राला या अधिनियमाची इतर प्रकरणे फेरफारांसह लागू करणे.

**३-ड.** कलम ३-ब च्या पोट-कलम (१) अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन योजना प्रसिद्ध झाल्यावर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलेल्या कोणत्याही क्षेत्राला, या अधिनियमाच्या इतर प्रकरणांच्या तरतुदी, पुढील फेरफारांसह अधीन राहून, लागू होतील :-

(अ) ** ** **

(ब) प्रकरण चार मध्ये,–

(एक) व (दोन) ** ** **

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्राचा विकास करण्याचा अधिकार.

(तीन) १३. (१) कलम १२ च्या पोट-कलम (१०) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही जमिनीला सामूहिक आर्थिक कार्य क्षेत्रासह झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आल्यानंतर, जर अशा जमिनीचे मालक, भूधारक किंवा भोगवटादार, अशा जमिनीच्या पुनर्विकासासाठीच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस समर्थन देणाऱ्या संरक्षित व इतर भोगवटादारांच्या पुनर्स्थाननिश्चिती व पुनर्वसन यांसाठी आवश्यक असलेली एकशेवीस दिवसांपेक्षा अधिक नसेल अशा वाजवी मुदतीच्या आत, याकरिता पुढे आले नाहीत तर, मुख्य कार्यकारी अधिकारी, त्या प्रयोजनासाठी अशी जमीन, आदेशानुसार, कोणत्याही अभिकरणाकडे किंवा इतर विकासकाकडे सोपवून अशा जमिनीचा पुनर्विकास करण्याचे ठरवील.

(२) ** ** **

(क) ते (ई) ** ** **

**३ई.** ते **३झ.** ** ** **

**३झ - १** ते **३झ-७** ** ** **

**४.** ते **१५.** ** ** **

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेखाली जमीन निहित असणे.

**१५ अ.** या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये किंवा विनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाच्या किंवा राज्य विधान मंडळाद्वारे अधिनियमित केलेल्या कोणत्याही कायद्यान्वये घटित केलेल्या, राज्य शासनाच्या, किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाच्या जमिनीच्या व मालमत्तेच्या हस्तांतरणाशी संबंधित, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाद्वारे यथोचितरीत्या मंजुरी दिलेल्या राज्य शासनाच्या किंवा अशा सार्वजनिक प्राधिकरणाच्या जमिनीवरच्या भूखंडावर राबविलेले झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे काम पूर्ण झाल्यावर, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे काम पूर्ण झाल्यापासून तीस दिवसांच्या आत, राज्य शासनास किंवा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास, राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेने, झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केलेली अशी जमीन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे निहित होईल, असे **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे घोषित करता येईल :

परंतु, अशी अधिसूचना, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने संबंधित सार्वजनिक प्राधिकरण, नागरी स्थानिक संस्था किंवा, यथास्थिति, नियोजन प्राधिकरण यांना कलम १७ अन्वये भू-संपादनासाठी अनुज्ञेय असलेली भरपाई प्रदान केल्यानंतरच प्रसिद्ध करण्यात येईल.

(२) ** ** **

**१६.** ते **३३.** ** ** **

योजनेत किंवा प्रकल्पात सामील होण्यास इच्छुक नसलेल्या झोपडपट्टी रहिवाशांना गाळ्यांचे वाटप करण्यासाठीची कार्यपद्धती.

**३३अ.** झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा किंवा झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पाचा भाग असलेली इमारत किंवा बांधकाम ज्याच्या कब्जात किंवा भोगवट्यात असेल आणि सक्षम प्राधिकरणाकडून कायमस्वरूपी पर्यायी निवासव्यवस्थेकरिता जे पात्र असतील आणि जे अशा योजनेमध्ये किंवा प्रकल्पामध्ये सामील होण्यास इच्छूक नसतील अशा झोपडपट्टी रहिवाशांच्या संबंधात, सक्षम प्राधिकरण, -

(अ) अशा सर्व झोपडपट्टी रहिवाशांकरिता योजनेच्या पुनर्वसन घटकाकरिता बांधावयाच्या इमारतींमध्ये कायमस्वरूपी पर्यायी निवास व्यवस्थेची तरतूद करण्याची खातरजमा करील ;

(ब) योजनेमध्ये किंवा प्रकल्पामध्ये सामील झालेल्यांना विकासकाने कळविल्यानुसार त्याच धर्तीवर, चिठ्या टाकून नियतवाटप करून, गाळा देण्यात येणार असल्याचे अशा झोपडपट्टी रहिवाशांना लेखी कळवील ;

(क) झोपडपट्टी रहिवाशांना किमान १२० चौरस फुटाच्या संक्रमण गाळ्याचे नियतवाटप करण्यात येईल किंवा त्यांना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून निश्चित केलेल्या भाड्याची रक्कम देण्यात येईल, असे कळवील ;

(ड) मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा त्याने नामनिर्देशित केलेला अन्य कोणताही अधिकारी, त्याच्या कब्जात असलेल्या बांधकामामधून अशा झोपडपट्टी रहिवाशांना निष्कासित करण्याचा आणि आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा कालावधीत असे बांधकाम किंवा त्याचा कोणताही भाग पाडण्याचा निदेश देईल आणि अशा निष्कासनाच्या प्रयोजनासाठी आवश्यक असेल अशा बळाचा त्यास वापर करता येईल किंवा वापर करण्याची तो व्यवस्था करील ;

(ई) खंड (ड) अन्वये ज्याच्या विरुद्ध कार्यवाही प्रस्तावित केली आहे अशा झोपडपट्टी रहिवाशांना लेखी कळवील की, अशी कार्यवाही केल्यानंतर ते संक्रमण गाळ्याकरिता किंवा पुनर्बांधकाम केलेल्या गाळ्याकरिता चिठ्यांद्वारे, पात्र असणार नाहीत मात्र, योजनेतील किंवा प्रकल्पातील इतरांनी आपापल्या गाळ्याची निवड केल्यानंतर जे उपलब्ध राहतील त्या गाळ्यांकरिताच केवळ हक्कदार असतील ;

(फ) योजनेच्या किंवा प्रकल्पाच्या पहिल्या इमारतीस बांधकाम परवानगी मिळेपर्यंत जर असे झोपडपट्टी रहिवासी सामील झाले नाहीत तर, ते कोणताही बांधलेला गाळा मिळण्याचा हक्क संपूर्णपणे गमावतील आणि त्यांचे गाळे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण हाती घेईल, आणि तिथल्या तिथेच, निवास व्यवस्था न होऊ शकलेल्या इतर झोपडपट्टी रहिवाशांची निवासव्यवस्था करण्याच्या प्रयोजनासाठी त्याचा वापर करण्यात येईल; आणि, सुमारे ३ मीटर ✕३.५ मीटरचे पीच इतरत्र जेव्हा केव्हा उपलब्ध होईल तेव्हाच केवळ ते मिळण्यास हक्कदार असतील आणि त्यामधील बांधकाम अशा झोपडपट्टी रहिवाशांना स्वतः करावे लागेल असे, अशा झोपडपट्टी रहिवाशांना लेखी कळवील."

**३४.** ** ** **

अपिले. **३५.** (१) ** ** **

(१अ) कोणत्याही व्यक्तीस,

(१अ) (अ) पोट-कलम (१) खालील अपील प्राधिकरणाने काढलेल्या कोणत्याही सुधारणा. नोटीसीने, दिलेल्या आदेशाने किंवा निदेशाने व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, अशी नोटीस, आदेश किंवा निदेश मिळाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या कालावधीत, तक्रार निवारण समितीसमोर अपील दाखल करता येईल ;

(ब) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने किंवा मुख्य कार्यकारी प्राधिकाऱ्याने ज्याला अधिकार प्रदान केलेले आहेत अशा कोणत्याही अधिकाऱ्याने काढलेल्या कोणत्याही नोटीसीने, दिलेल्या निदेशाने, काढलेल्या परिपत्रकाने, घेतलेल्या निर्णयाने, दिलेल्या आदेशाने, दिलेल्या परवानगीने किंवा मान्यतेने व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, अशी नोटीस, निदेश, परिपत्रक, निर्णय, आदेश, परवानगी किंवा मान्यता मिळाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या कालावधीत, शिखर तक्रार निवारण समितीसमोर अपील दाखल करता येईल.";

(२) ते (४) ** ** **

(५) तक्रार निवारण समितीने व शिखर तक्रार निवारण समितीने अपिलावर दिलेला निर्णय अंतिम असेल व कोणत्याही न्यायालयात त्यावर हरकत घेतली जाणार नाही.

**३६. ते ४७.** ** ** **

**अनुसूची.** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.**

**[ सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७६. ]**

**[ महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.]**

**[श्री. एकनाथ शिंदे,**
उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण).**]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.